**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्रमांक :- २००९/रामाआ/तक्रार/०८**
**दिनांक :- १९/०६/२००९**

**तक्रारदार** :- श्री.अन्सारी एजाज अहमद फारुक, स.नं.७४/४, प्लॉट क्र.६३,अन्सारी कॉलनी, जूना आग्रारोड, मालेगांव, जि.नाशिक

**निर्णय**

तक्रारदार श्री.अन्सारी एजाज अहमद फारुक, स.नं.७४/४, प्लॉट क्र.६३,अन्सारी कॉलनी, जूना आग्रारोड,मालेगांव, जि.नाशिक यांनी दिनांक ११-०६-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अंजुमन तरक्की-ए-तालीम, (सार्वजनिक न्यास नोंदणी क्रमांक एफ-२४-एनएसके) मालेगांव,जि.नाशिक या नोंदणीकृत ट्रस्टच्या सचिवांनी ट्रस्टला माहिती अधिकार अधिनियम-२००५ लागू नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराचे माहिती मागणीचे अर्ज परत केले, या कारणामुळे थेट आयोगाकडे तक्रार केली आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नोंदणीकृत पब्लीक ट्रस्टशी संबंधित रिट याचिका क्रमांक ५२९४/२००८, दिनांक २८-०४-२००९ रोजी मध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित केले आहे.

"If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the Public Trust Act. to have such information, which the Charity Commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act. In the circumstances, the petition has to be allowed. Order passed by both the authorities are set aside and quashed. Petition is allowed. Rule is made absolute.

मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार नोंदणीकृत पब्लीक ट्रस्टला माहितीचा अधिकार लागू नसल्यासंबधी दिलेला वरील निर्णय लक्षात घेता, पब्लीक ट्रस्टने त्यांचेकडे केलेला माहिती मागणीचा अर्ज, ट्रस्टला माहिती अधिकार अधिनियम-२००५ लागू नसल्यामुळे तक्रारदारास परत केला हे सदर ट्रस्टचे म्हणणे योग्य असल्याने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) तक्रार फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक :१९-०६-२००९

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**औरंगाबाद**

**प्रत :-**

१) तक्रारदार श्री.अन्सारी एजाज अहमद फारुक, स.नं.७४/४, प्लॉट क्र.६३,अन्सारी कॉलनी, जूना आग्रारोड, मालेगांव, जि.नाशिक कार्यवाहीसाठी (आरपीएडीद्वारे)

२) निर्णय नस्ती